NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परीक्षा विभाग

**परिपत्रक क्र. २४/२०१७**

**विषय :महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून स्वीकारले जाणारे शुल्क हे रोकडविरहित [Cashless] करण्याबाबत.**

मा. प्राचार्य/मा. प्राचार्या/ मा. संचालक/परिसंस्था सर्व संलग्नित महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, राज्य शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार रोकडविरहित व्यवहार करण्याबाबत विद्यापीठाने महाविद्यालयांना वेळोवेळी कळविलेले आहे. महाविद्यालयांना रोकडविरहित [Cashless] व्यवहार करण्यासाठी NEFT/RTGS/DEBIT CARD/CREDIT CARD/ NET BANKING/POS [Swipe Machine] इ. माध्यमातून विविध प्रकारचे शुल्क स्वीकारता येवू शकते. परीक्षा विभागाकडून महाविद्यालयीन स्तरावरचे व थेट विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष देण्यात येणा-या सेवाकरीता लागणारे शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने रोकडविरहित केलेले आहे. यामध्ये प्रवेश व पात्रता शुल्क, परीक्षा शुल्क, इ. तसेच विद्यार्थ्यांसाठी स्थलांतर दाखला, पदवीप्रमाणपत्र, ई-ट्रान्स्क्रीप्ट, ई-एज्युकेशनल डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन, दुय्यम गुणपत्रक इ. शुल्क हे रोकडविरहित पध्दतीने घेण्यात येते.

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर आकारले जाणारे शुल्क हे वेळोवेळी महाविद्यालयात जमा करावे लागते. यामध्ये काही महाविद्यालये चलन स्वरूपात आपल्या परिसरातील बँक खात्यात व काही महाविद्यालये कॅश काऊंटवर रोख रक्कमेद्वारे सदरचे शुल्क स्वीकारतात. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांचा बहुतांश वेळ व श्रम यांचा अपव्यय होवून याचा परिणाम त्याच्या शैक्षणिक कामकाजावर होतो. या शुल्कामध्ये परीक्षा शुल्क, उत्तरपत्रिका छायांकित लागणारे शुल्क, पुनर्मुल्यांकन लागणारे शुल्क इ.

वरील सर्व बाबी विचारात घेता, महाविद्यालयांना पुनश्च कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात जमा करावयाच्या शुल्कासाठी NEFT/RTGS/DEBIT CARD/CREDIT CARD/NET BANKING/POS [Swipe Machine] इ. माध्यमांचा उपयोग करण्यात यावा व याकरीता महाविद्यालयाने आपल्या बँक खात्याचे तपशील हा सर्व विद्यार्थ्यांना माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात यावा. या माहितीमध्ये मुख्यत: College Address with Pincode, Bank Name, Account Name, Account Type (Saving/Current), Branch Name, Account Number, IFSC Code No. इ. या बाबींचा समावेश असावा.

वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांने ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यानंतर त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे महाविद्यालयाच्या बँक खात्यात जमा झालेले शुल्काची खात्री करून त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

सबब, मा. प्राचार्यांनी या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबी महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व इतर संबधीत घटकांच्या निर्देशनास आणून विद्यार्थ्यांकडून स्वीकारण्यात येणारे विविध प्रकारचे शुल्क रोकडविरहित पध्दतीने स्वीकारून विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देवून विद्यापीठ कार्यालयास सहकार्य करावे.

[बी. पी. पाटील]
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : सोविसो/परीक्षा/२०१७/१६६१ दि.१७/०७/२०१७